MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -२९ | बुधवार दि.१६ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -29 | WEDNESDAY DT.16 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या पथकाची माजलगावात कारवाई



एक लाख वीस हजार रुपयांचा गुटखा जप्त केला.

**प्रतिनिधी ।** माजलगांव

दिनांक १५.१०.२०२४ रोजी सकाळी अप्पर पोलीस अधीक्षक तिडके मॅडम यांना गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की माजलगाव ग्रामीण हद्दीमध्ये मौजे सादोळा या ठिकाणी एक इसम गुटख्याचा साठा करून विक्री करत आहे. सदरच्या माहितीच्या आधारे कार्यालयातील अधिकारी व अंमलदार यांना सदर बातमीच्या ठिकाणी जाऊन खात्री करण्यास सांगितले. त्यानुसार पंचांना सोबत घेऊन अधिकारी व अंमलदार यांनी सादोळा येथे राजू गोपाळराव साखरे यांच्या कन्फेशनरी दुकानात छापा टाकून खात्री केली असता त्याच्याकडे वेगवेगळ्या किमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला गुटखा व सुगंधी तंबाखू त्याच्या ताब्यात मिळून आली.

त्यानुसार दोन पंचा समक्ष पंचनामा करून व सदरचा १,२००००-/ रुपये किमतीचा गुटख्याचा माल ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन माजलगाव ग्रामीण येथे गुन्हा दाखल केला. सदरची कारवाई अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्रसिंग ठाकूर, संजय राठोड, सचिन सिद्धेश्वर, तानाजी तागड राऊत, बाबरी यांनी केली

# पँथर सेनेकडून महाविकास आघाडीला जागा वाटपासाठी अल्टिमेटम

राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. अशातच महाविकास आघाडीसोबत असलेल्या पँथर सेनेने महाविकास आघाडीकडे जागा वाटपाचा प्रस्ताव दिलाय. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला छोट्या घटकांना विसरून चालता येणार नाही. आंबेडकरी चळवळीतील नवा चेहरा म्हणून आम्ही लढतो आहोत. मात्र, आमच्याशी दगा फटका देण्याचं काम झालं तर याचा फटका महाविकास आघाडीला झाल्याशिवाय राहणार नाही. आम्ही दिलेला प्रस्ताव तात्काळ मान्य केला पाहिजे. अन्यथा पँथर सेना महाराष्ट्रात ५० च्या वर जागा स्वतंत्र लढण्याच्या तयारीत असल्याचा इशारा ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांनी महाविकास आघाडीला दिला आहे.

दीपक केदार आज बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर ते बीड जिल्ह्याचा आढावा घेत आहेत. लोकसभा निवडणुकीत जरांगे फॅक्टरचा परिणाम पाहायला मिळाला. आता विधानसभा निवडणुकीत देखील मराठा आरक्षणाचा शंभर टक्के परिणाम दिसून येणार आहे. आचारसंहिता लागण्यापूर्वी भाजपाने आरक्षणासंदर्भात कोणतीही भूमिका घेतली नाही. मराठा आरक्षणाचे भिजते घोंगडं ठेवण्याचे षडयंत्र देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्याचा फटका या निवडणुकीत बसल्याशिवाय राहणार नसल्याचं दीपक केदार यांनी म्हटल आहे.



म्हणाले, दगा फटका झाला तर....

### तुम्ही कोयता कधी हातात घेतला आहात का?

तर दसरा मेळाव्या दरम्यान पंकजा मुंडे यांनी कोयत्याला धार लावून ठेवा, असं विधान केले होते. यावर केदार यांनी भाष्य करत कोयत्याला धार लावण्याची भाषा दंगलीची भाषा आहे. तुम्ही कोयता कधी हातात घेतला आहात का? कोयता हातात घेणाऱ्याचे दुःख तुम्हाला माहित आहे का? असा सवाल उपस्थित करून कोयता मुक्त बीड जिल्हा कसा होईल हे पाहावं. असं आवाहन ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांनी पंकजा मुंडेंना केले आहे.

### जातीपातीच्या राजकारणावरुन पंकजा मुंडे संतापल्या

मी साताऱ्याला गेले होते. तेव्हा उदयनराजे भोसले यांनी मला घरात नेलं आणि माझ्या हाताने आरती केली, तेव्हा त्यांच्या वडिलांच्या बाजूला गोपीनाथ मुंडेंचा फोटो होता. मात्र, आज राज्यात काय स्थिती आहे? अशी विचारणा पंकजा मुंडे यांनी केली. एखाद्याच्या गाडीचा अपघात झाला तर चालकाचे जात विचारली जाते. चिमुकलीवर अत्याचार झाल्यास त्याची जात विचार जात विचारली जाते. ही वेळ पाहण्यासाठी आयुष्यातील २२ वर्षे घालवली का? असा संतप्त सवाल पंकजा मुंडे यांनी विचारला.

## केज शहरात भाजीपाल्याचे भाव कडाडले

केज / प्रतिनिधी

यंदा पाऊसकाळ चांगला झाला असून आठवडी बाजारात भाजीपाल्याची आवक मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र भाजीपाल्याचे भाव आणखी कमी झालेले नसून प्रत्येक भाजीचा किलोचा भाव ८० रुपयांच्या पुढे आहे.

यंदा पावसाने साथ दिल्याने शेतकरी वर्ग सुखावला आहे. सर्वत्र पाणी झाल्याने यंदा रब्बीच्या पिकांचे क्षेत्र वाढणार आहे. पाणी झाले असले तरी बी बियाणे, खते, औषधांच्या किंमती कमी झाल्या नसल्याने उत्पन्नांवर केला जाणारा खर्च वाढलेला आहे. सोयाबीनला अपेक्षित भाव मिळत नसल्याने खर्च आणि निघणारे उत्पन्न यातून शेतकऱ्यांच्या पदरात जास्त काही पडत नाही. मात्र भाजीपाल्याचे पीके शेतकऱ्यांकडून फायदेशीर ठरत आहेत. आठवडी बाजारात भाजीपाल्याची आवक वाढलेली आहे. मात्र भाव वाढलेले असून टोमॅटो, वांगे, शेवगा हे शंभर रुपये किलो आहेत. तर मिरची, गवार, मेथी, ढोबळी मिरची, फुलकोबी, दोडका या भाजीपाल्याचा किलोचा भाव ८० रुपयांच्या पुढे आहे.

## घाटनांदूर येथील शादीखान्याची मागणी धनंजय मुंडेंनी केली पूर्ण

### शादीखान्यासाठी ७५ लाख रुपये निधी मंजूर

**प्रतिनिधी ।** मुंबई

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी मतदारसंघातील घाटनांदूर येथील मुस्लिम बांधवांना दिलेला शब्द पूर्ण केला असून, आज आचार संहिता लागण्यापूर्वी घाटनांदूर येथील शादीखाना उभारण्यासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाकडून ७५ लाख रुपये निधी खर्चास मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभागाकडून आज निर्गमित करण्यात आला असून, याबद्दल धनंजय मुंडे यांनी अल्पसंख्याक विकास विभागाचे मंत्री अब्दुल सत्तार यांचे आभार मानले आहेत.

धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून याआधी सिरसाळा येथील शादीखान्याचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्याचबरोबर बरदापुर, पोहनेर, मिरवट, धसवाडी, पिंपळा धायगुडा आदी गावांमध्ये शादीखाने उभारण्यास निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

## १३ कोटीचा रस्ता सामान्य जनतेचा होतंय जीवघेणा प्रवास

**प्रतिनिधी ।** सिरसाळा

१३ कोटीचा हा रस्ता शिरसाळा ते पोहनेर या रस्त्याची दुरावस्था मात्र गुत्तेदार झाला मालामाल या रस्त्यावर रहदारी २५ ते ३० गावांची दळणवळणासाठी हा रस्ता जोडलेला आहे पण इथल्या काही राजकारण्यांनी व गुत्तेदाराने या रस्त्याची दूर व्यवस्था केली आहे. दोन ते तीन वर्ष पूर्ण न होता या शिरसाळा ते पोहनेर रस्त्याचे तात्पुरते काम मुरूम व दगड टाकून रस्ता बनवला होता पण आता या रस्त्याची अवस्था पाहता बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी या रस्त्यावर उतरून या रोडची व खड्ड्यांची मोजमापणी करून सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला होता तरीही त्या गुत्तेदाराला आजपर्यंत



जाग आली नाही यामध्ये स्वतः बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी या रस्त्याची पहाणी करून परळी तालुक्यातील हे शिरसाळा_ पोहनेर_पिंपरी कासारवाडी नंदापुर जळगव्हाण दिग्रस रामनगर तांडा जळगाव तांडा असे बरेच गावे व दिग्रस या रस्त्याने रोज त्यांना जीवाची परवा न करता व कसरत करून त्याच खड्ड्यांमधून मोटरसायकल असो किंवा फोर व्हीलर असो जीव घेणे प्रवास करावा लागतो तरी टप्प्याटप्प्याने या रस्त्याचे मुरूम दगड थोडं डांबर टाकून दिसण्यासाठी व लोकांच्या समाधानासाठी हा गुत्तेदार तितक्यापुरतच काम करतो यासाठी या परिसरातील ग्रामपंचायतच्या सरपंच उपसरपंच व गावकऱ्यांच्या या गुत्तेदाराच्या विरोधात उपोषण करण्याची वेळ आली आहे तरीसुद्धा या गुत्तेदाराला जाग येत नाही रस्ता खड्डेमय झाल्यामुळे रहदारीची दिशा बदलली आहे जनसामान्य लोकांची शिरसाळा ते पोहनेर जाण्याचा मार्ग बदलला आहे ते आज परवासी सोनपेठ मार्ग कासारवाडी असे जात आहेत तरी बीड जिल्ह्याचे खासदार .बजरंग सोनवणे. हे कासारवाडी रामवाडी येथे १३. १० .ला मातृशोक झालेल्या श्री. प्रभाकर पोळ यांच्या सांत्वन पर भेटीस गेले होते

# अखेर कालिंदेश्वर मंदिर बिल्डरांच्या पाशातून मुक्त ; सामाजिक कार्यकर्त्यांच्या लढ्याला यश:- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी ।** बीड

**बीड शहराच्या मोंढा परीसरातील बिंदुसरा नदीपात्राताशेजारील ५०० वर्षापुर्वीचे मराठवाड्याच्या मंदिरनिर्मिती प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असणारे द्विमितीय शिल्पांच्या दृष्टीने राजस्थानी शिल्प संस्कृतीतील शिल्प मराठवाड्याच्या मंदीर स्थापत्य इतिहासातील उल्लेखनीय दगडी आकर्षक महादेवाचे कालिंदेश्वर मंदिर हडप करण्याचा बिल्डरांचा डाव अखेरीस उधळला असुन तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भुसुधार) प्रकाश आघाव यांनी देवस्थानची वर्ग २ ची जमिन वर्ग १ करण्याचे दिलेले आदेश बेकायदा ठरवत विद्यमान उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) शैलेश सुर्यवंशी यांनी रद्द केले आहेत. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड,शेख युनुस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गेल्या ३ वर्षांपासून लक्ष्यवेधी आंदोलने करून शासन दरबारी पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.**

ऐतिहासिक, पौराणिक वारसा लाभलेले शहर म्हणून बीड शहर ओळखले जाते.बीड शहराच्या मध्यभागातुन वाहणाऱ्या बिंदुसरा नदीच्या काठावर अनेक ऐतिहासिक व पौराणिक वास्तु आहेत.बिंदुसरा धरणापासून ते ३ नद्यांचा त्रिवेणी संगम असलेल्या नामलगाव पर्यंत नदी पात्राच्या कडेला एकुण १२ महादेवांचे मंदिर असुन याला नदीपात्रातील १२ ज्योतिर्लिंग म्हणतात. यापैकी शहरातील श्रीकृष्ण मंदिराच्या पुढे बिंदुसरा नदीपात्राच्या पश्चिमेला फुलाई नगर भागात संपूर्ण दगडी बांधकाम असलेले महादेवाचे पुरातन कालिंदेश्वर मंदिर आहे.पुर रेषेच्या हद्दीत इनाम जमिनीमध्ये साधारणतः ५०० वर्षापुर्वीचे मंदिर असुन बाजुला ऐतिहासिक बारव आणि बारवा शेजारी एक ऐतिहासिक दर्गा आहे जो हिंदू मुस्लिम धर्माचे ऐक्याचे प्रतिक आहे.मात्र सदर ४६ गुंठे जमीन बिल्डरांनी बेकायदेशीर खरेदी



केली.याठिकाणी अपार्टमेंट बांधकाम करतानाच नदीपात्राचा प्रवाह वळवुन सिमेंटची संरक्षण भिंत उभारून मंदिराची जागा बळकावली.याबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड, शेख युनुस यांनी व सहका-यांनी गेल्या ३ वर्षांपासून वारंवार निवेदने तसेच आंदोलनाद्वारे शासनाकडे पाठपुरावा केला. त्यामुळे अखेर तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भुसुधार) प्रकाश आघाव यांनी सदर इनाम जमिन वर्ग दोनची वर्ग १ करण्याची परवानगी दिलेले आदेश उपजिल्हाधिकारी ( सामान्य प्रशासन) शैलेश सुर्यवंशी यांनी रद्द केले आहेत.याबाबत त्यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील शासकीय अभियोक्त्यांनाही कळविले आहे.गट नंबर १९३ मधील ४६ गुंठे जमीन भोगवटदार वर्ग २ मधुन भोगवटदार वर्ग १ करण्याची रमेश सोहनलाल सारडा यांना दिलेली परवानगी अनेक नियमांना बगल देत दिली असल्याचे या आदेशात म्हटले आहे.परवानगी देताना जिल्हाधिका-यांची मान्यता घेतलेली नाही.तहसिलदारांचा अहवाल न घेताच आधिकाराचा गैरवापर झाला.सदर इनाम जमिन सक्षम प्राधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय वाटणी प्रबंध असताना जमिनीचे वाटपपत्र केल्यामुळे या प्रकरणात शर्थभंग झाल्याचे दिसून येते त्यामुळे जुना आदेश रद्द केल्याचे या आदेशात म्हटले आहे.

कालिंदेश्वर मंदिर परिसरात अतिक्रमित बांधकाम प्रकरणात कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली शिवलिंग पुजन नगरपरिषदेला प्रतिकात्मक श्रद्धांजली जिल्हाधिकारी साहेब; बिंदुसरेला जाणुन घ्या आदि लक्ष्यवेधी आंदोलने करण्यात आली. आंदोलनाच्या अनुषंगाने डॉ.गणेश ढवळे यांच्या तक्रारीनंतर डॉ.निलम पाटील सहायक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांनी दि.२२.०५.२०२३, दि.२९.०५.२०२३ आणि दि.०८.०६.२०२३ रोजी ३ वेळा मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांना नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे आदेश देऊनही सीईओ नीता अंधारे यांनी भुमाफियांची पाठराखणच केली.

### शैलेश सुर्यवंशी यांचा धाडसी निर्णय :- रामनाथ खोड

बीड शहरातील बड्या बिल्डरांच्या बाबतीत बेकायदा जमिन वर्ग १ करण्याचा तत्कालीन उपजिल्हाधिकारी प्रकाश आघाव यांचा आदेश रद्द करणे हा विद्यमान उपजिल्हाधिकारी ( सामान्य प्रशासन)शैलेश सुर्यवंशी यांचा धाडसी निर्णय त्यांच्या कर्तव्यदक्षतेवर मोहोर उमटवणारा असुन या निर्णयामुळे देवही बिल्डरांच्या पाशातून मुक्त झाले असुन सामाजिक कार्यकर्ते यांना दिलासा देणारा निर्णय कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी दिली आहे.

# एस. टी. चालक, वाहक, कर्मचाऱ्यांसाठी मोफत बी. पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर!

## रोटरी मिडटाऊन व अनिलदादा जगताप मित्रमंडळाचा स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी** । बीड

सामाजिक कार्यात कायम प्राधान्याने पुढाकार घेत असलेल्या रोटरी मिडटाऊन आणि अनिलदादा जगताप मित्रमंडळाच्या संयुक्त विद्यमाने एस. टी. चालक, वाहक, कर्मचाऱ्यांसाठी मोफत बी. पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे दिनांक १६/१०/२०२४ व १७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० यावेळेत बस स्थानक परिसरात आयोजन करण्यात आले आहे. एस. टी. चालक, वाहक, कर्मचारी हे अहोरात्र प्रवश्यांसाठी तत्पर सेवा देत असतात, त्यामध्ये त्यांचे शरीराकडे अगदी दुर्लक्ष होत राहते असं म्हंटलं तर वावगं ठरणार नाही. एस टी चा प्रवास सुखाचा प्रवास हे ब्रीद वाक्य उराशी घेवून हे कर्मचारी काम करत असतात. मागे अशीच बातमी वाचण्यात आली की, चालकाला हृदय विकाराचा झटका आला तरी त्यांने प्रसंगावधान राखून गाडीतील प्रवशांचा जीव वाचवला. असे प्रकार होवू नये म्हणून म्हणतात ना प्रिव्हेनशन इज बेटर द्यान क्युअर या उद्देशाने एस. टी. चालक, वाहक, कर्मचाऱ्यांसाठी मोफत बी. पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर रोटरी मिडटाऊन व अनिल दादा जगताप मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक१६/१०/२०२४ व १७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० यावेळेत बस स्थानक परिसरात घेण्यात येणार आहे. या शिबीरामध्ये सर्व तपासण्या या चंपावती नेत्रालय येथील तज्ञ डॉक्टर व रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे तज्ञ डॉक्टर करणार आहेत. यामध्ये चंपावती नेत्रालय येथील तज्ञ डॉक्टर डॉ. नारायण आळणे, डॉ. प्रदिप सानप, डॉ. रविंद्र गालफाडे व त्यांची टीम तसेच रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे तज्ञ डॉ. रो. किरण सवासे, रो. डॉ. निलेश जगदाळे हे सेवा देणार आहेत. या शिबीरामध्ये तपासणी केल्यावर मोफत नंबरचे चष्मे देण्यात येणार आहेत, तसेच बी. पी. शुगर हे देखील मोफत तपसण्यात येणार असून त्यांना त्यानुसार योग्य तो सल्ला देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ज्या तपासणी केलेल्या चालक वाहक व कर्मचारी यांना मोतिबिंदू चे निदान होईल अशाचे मोतिबिंदू चे ऑपरेशन देखील मोफत करण्यात येणार आहे. रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व अनिल दादा जगताप मित्र मंडळ हे दोन्ही सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्य विषयक सामाजिक उपक्रम घेत असतात यावेळी या दोन्ही सामाजिक संघटनाच्या संयुक्त विद्यमाने हा एस.टी. चालक, वाहक व इतर कर्मचारी यांच्यासाठी हा अत्यंत महत्वाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे तरी सर्व



,एस.टी. चालक, वाहक व इतर कर्मचारी यांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आव्हान दोन्ही संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# गावंदरा जि प शाळेचा यशवर्धन कांबळे विभागीय स्तरावर कुस्ती स्पर्धेत दुसरा



**प्रतिनिधी** । किल्ले धारूर

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा गावंदरा ता.धारूर जि.बीड येथील यशवर्धन सुरेश कांबळे याचा परभणी येथे झालेल्या झालेल्या कुस्ती स्पर्धेत वयोगट १४ वर्ष ५७ किलो वजनी गटात विभागात दुतीय क्रमांक मिळवला.तालुक्यातील गटशिक्षण अधिकारी अमोल कोल्हे , वरिष्ठ विस्तार अधिकारी अंडील गणेश गिरी, केंद्राचे केंद्र प्रमुख दत्तात्रय घोळवे, केंद्रीय मुख्याध्यापक साखरे क्रीडा शिक्षक कदम, व्यवस्थापन समिती अध्यक्ष अरुण बडे ग्रामपंचायत सरपंच आयुध्या सौंदरमल उपसरपंच बिभीषण बडे तसेच गावंदरा शाळेतील शिक्षक मुंडे सर, चौधरी सर, सीताप सर मुंडे मॅडम, फरताडे मॅडम, मोत्तेवार मॅडम यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेछया दिल्या.त्याचे कुस्ती कोच अनिकेत गोरे आम्हाला क्रीडा मार्गदर्शक म्हणून लाभलेले घुले व त्याचे वडील सुरेश कांबळे यांचे पण अभिनंदन केले




**प्रतिनिधी** । बीड

आहेरवडगाव येथे वसंतराव नाईक मराठवडा कृषि विद्यापीठांतर्गत आदित्य शिक्षण संस्थेच्या, जि. बीड येथील आदित्य कृषि महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील कृषिकन्या प्राची कांबळे,प्राची भोंडे,वैष्णवी शितोळे,आरती फड , लिपाक्षी आघाव , वर्षदा कव्हर यांनी आधुनिक शीत गृहाबद्दल शेतकऱ्यांना ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत शून्य ऊर्जेवर आधारित शीत कक्ष बनवण्याची पद्धत व फायदे शेतकऱ्यांना सांगितले, आणि शीत कक्ष का व कशासाठी बनवायचे याची देखील माहिती सांगितली. शीत कक्ष बांधायला सोपा व कमी खर्च असल्याने शेतकरी आपल्या शेतात ते बांधू शकतात, व थोड्या दिवसांसाठी फळे, भाजीपाला बाजारात विक्रीसाठी नेण्यापूर्वी त्यामधे साठवू शकतात. बाहेरील तापमानापेक्षा शीत कक्षामध्ये १० डिग्री सेल्सिअस इतके कमी तापमान असते व ९५ डिग्री सेल्सिअस आद्रता असते. त्यामुळे उष्ण ऋतूत याचा उपयोग होतो. तसेच या अभ्यासा दरम्यान विद्यार्थिनीना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषिमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुकाराम तांबे सर,श्याम भुतडा सर, प्राचार्य सानप सर, तसेच ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप मोरे सर, कार्यक्रम अधिकारी वैभव शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिकन्यानी आधुनिक शीत गृहाबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी गावातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

# गेवराई तालुक्यातील संजय गांधी व श्रावणबाळ निवड याद्यात गदारोळ

## योग्य लाभार्थांची निवड न केल्यास त्वरिता गाव तलावात जल समाधी घेणार - शेख खिजर

**प्रतिनिधी** । गेवराई

गेवराई : तालुक्यातील राजकिय पटलावर सातत्याने राजकीय कुरखोड्याचे राजकारण होत आसल्याचे जाणकार सांगतात. परंतु सर्व सामान्यांना मिळणा-या विविध शासकीय योजनेचे श्रेय घेण्या संदर्भात देखील प्रशासना कडे विरोध दर्शवून मंजुर झालेल्या योजना देखील काही सत्ता पिपासु बंद पाळण्याच्या पातक कृत्य अंगीकारत असल्याची पण चर्चा होतांना ऐकावयास मिळते. गत काही वर्षा पूर्वी मोठ्या प्रमाणात श्रावणबाळ, संजयगाधी निराधार योजनेचे मंजुरी पत्र वाटप करण्यात आले होते. त्यात त्या वेळी ज्यांनी खुळ घातली होती आता त्यांनीच मोठ्या प्रमाणात नवतरुणाईला व फळ बागायत दारांना प्राधान्य देत श्रावणबाळ, संजयगाधी योजनाच्या याद्या जाहिर केल्या. या मुळे ख-या लाभार्थांकडुन नाराजगी जाहीर केल्या जात असुन नाराज घटकाची दखल घेऊन

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर सौदागर यांनी गेवराई तहसिल कार्यालय येथे निवेदन देऊन ख-या लाभार्थींना न्याय मिळण्या संदर्भात मागणी केली होती. तहसील प्रशासनाने या कडे दुर्लक्ष केल्याने दिनांक १५/१०/२०२४ रोजी बीड जिल्हाधिका-यांना या बाबतीत पुन्हा निवेदन दिले असुन त्यामध्ये म्हटले आहे की शासकीय संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या यादीत योग्य लाभार्थ्यांचे व वयोवृध्द, विधवा यांचे नाव न आल्याने मौजे तलवाडा येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने दि.२१/१०/२०२४ सोमवार रोजी तलवाडा येथील त्वरिता साठवण तलाव मध्ये जलसमाधी घेण्यात येईल आम्ही दि.११/१०/२०२४ रोजी मा. तहसिलदार साहेब गेवराई यांना निवेदन दिले होते. तरी या विषयावर काहीच निर्णय झालेला नाही. योग्य लाभार्थ्यांची अधिकाऱ्या मार्फत अर्जाची छाननी करण्यात यावी व पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा. नसता त्याकरीता आम्ही जलसमाधीचा निर्णय घेतला आहे. तरी मा. जिल्हाधिकारी साहेब आपण या विषयाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष द्यावे, अशी विनंती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन,व जयदेव शिंगने यांनी निवेदनाच्या शेवटी केली आहे.




# गेवराई-जातेगाव- सेलू रस्त्यामुळे वीस ते पंचवीस गावच्या दळणवळनाचा मार्ग होणार सुकर - आ.लक्ष्मण पवार

## ११४ कोटी रुपयाच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे आ.पवार यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

**प्रतिनिधी** । गेवराई

गेवराई विधानसभा मतदार संघातील सर्वच प्रमुख रस्त्याचे प्रश्न आता मार्गी लागले आहेत. तसेच गेल्या अनेक वर्षापासून जातेगाव-गेवराई या मुख्य रस्त्याची अवस्था बिकट झाली होती. याबाबत मी अनेक वेळा पाठपुरावा केल्यानंतर अखेर या रस्त्याला महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ अंतर्गत मंजुरी मिळाली असून या रस्त्यामुळे आता ग्रामीण भागातील जनतेच्या दळणवळणाचा मार्ग सुकर होणार असल्याचे प्रतिपादन आ.लक्ष्मण पवार यांनी केले.

दि. १५ रोजी सकाळी केकत पांगरी येथे गेवराई - जातेगाव - सेलू या ११४ कोटी रुपयांच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे उदघाटन आ.लक्ष्मण पवार यांच्या हस्ते व युवा नेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रकाश काका सुरवसे, राहुल जिजा खंडागळे, सुशील




जवंजाळ, राजेंद्र राक्षभुवनकर, भगवान घुंबार्डे, प्रा.शाम कुंड, शिनुभाऊ बेदरे, दादासाहेब गिरी, मधुकर वादे, आप्पा कानगुडे, राम पवार, समाधान मस्के, अमोल मस्के, ईश्वर पवार, लक्ष्मण चव्हाण, मुन्ना शेठ यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ.लक्ष्मण पवार यांनी सांगितले की, गेल्या दहा वर्षाच्या काळात आपण केलेली कामे ही जनतेच्या कायम स्मरणात राहतील. माझ्या परीने मी प्रामाणिक प्रयत्न करून मोठ्या प्रमाणात निधी आणून तालुक्याच्या तळागाळातील राष्ट्र्याव्हे प्रश्न मार्गी लावले. तसेच येणाऱ्या काळातही आपण आता जलसिंचनाच्या प्रश्नावर काम करणार आसल्याचे त्यांनी सांगितले. तर जातेगाव सर्कल मधील ग्रामीण भागातील जवळपास सर्व गावचे प्रमुख रस्ते यापूर्वी आपण पूर्ण केलेले आहेत. हाच मुख्य रस्ता बाकी होता आता तो ही मार्गी लावला आहे. हा पूर्ण रस्ता सिमेंट कॉंक्रीटने होणार असून तो दर्जेदार आणि टिकाऊ करून घेण्याची आपली जबाबदारी आहे. या रस्त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या दळवळणाचा मार्ग सुकर होणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाला सरपंच ज्ञानेश्वर जाधव, बाळासाहेब लगड, कृष्णा पाटोळे, गोपाल चव्हाण, रमेश राठोड, छगन पवार, कृष्णा पवार, रमेश राठोड, लक्ष्मण कोकाट, दत्ता गिरे, शिवाजी राठोड, परमेश्वर गिरे, राजकीरण लगड, बाळू पांढरे, आत्माराम जगताप, विष्णू महाराज जगताप, कारभारी कोकरे, देवराज कोळे, दादासाहेब चव्हाण, पापा पंडित, प्रकाश पवार, सुरेश पवार, मोहन जाधव, भास्कर खवले यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच, सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गेवराई पंचायत समिती गटविकास अधिकारी पदाचा अशोक राठोड यांनी स्विकारला पदभार

**प्रतिनिधी** । गेवराई

गेवराई : येथील पंचायत समिती गटविकास अधिकारी पदाचा अशोक राठोड यांनी मंगळवारी पदभार स्विकारला. यावेळी त्यांचे पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच तालुक्यातील अनेकांनी त्यांना भेटून अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. गेवराई येथील पंचायत समिती कार्यालयाचा कारभार मागील काही महिण्यात मोठ्या प्रमाणावर रेंगाळला होता. यामुळे तालुक्यातील नागरिकांची कामे खोळंबली होती. तत्कालीन गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे या कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने त्यांच्याविषयी तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यातच त्या चार दिवसांपूर्वीच दिर्घ रजेवर गेल्याने येथील पंचायत समितीचा कारभार पुर्णतः ठप्प झाला होता. दरम्यान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार गेवराई गटविकास अधिकारी म्हणून अशोक राठोड यांना नियुक्ती देण्यात आली. यानंतर मंगळवारी दुपारी अशोक राठोड यांनी गेवराई पंचायत समिती गटविकास अधिकारी म्हणून पदभार स्विकारला. यावेळी पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने अशोक राठोड यांचे स्वागत करण्यात आले. गटविकास अधिकारी म्हणून पदभार घेतलेले अशोक राठोड यांनी यापूर्वी गेवराई पंचायत समिती कार्यालयात तालुका कृषी अधिकारी म्हणून अनेक



वर्षे काम पाहिलेले आहे. त्यामुळे त्यांना या तालुक्यातील कामकामाचा मोठा अनुभव असून एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची तालुक्यात ओळख आहे. त्यांनी गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्विकारल्याने तालुक्यातील अनेकांनी प्रत्यक्ष भेटून अशोक राठोड यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कामांना देणार प्राधान्य, गेवराई पंचायत समितीचा मंगळवारी दुपारी अशोक राठोड यांनी गटविकास अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला. दरम्यान आगामी काळात पंचायत समिती स्तरावरील विविध कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी आपले प्राध्यान्य असेल, असे यावेळी अशोक राठोड यांनी यावेळी सांगितले.

# गेवराई शहरात अमरसिंह पंडित यांच्या हस्ते १.३० लक्ष रुपये किंमतीच्या कामांचा शुभारंभ

**प्रतिनिधी** । गेवराई

गेवराई : जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित यांच्या हस्ते गेवराई शहरात १ कोटी ३० लाख रुपये किंमतीच्या विविध विकास कामांचा भव्य शुभारंभ करण्यात आला. अहिल्यानगर येथे सिमेंट रस्ता बांधकाम, सरस्वती कॉलनी येथे महादेव मंदिराचे सभा मंडप बांधकाम, नाईक वस्ती येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम आणि शिवाय नगरी येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकामाचा यामध्ये समावेश आहे. सर्व कामे दर्जेदार पद्धतीने करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे वाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, माजी जि.प. सदस्य जालिंदर पिसाळ, भवानी बँकेचे उपाध्यक्ष हन्नानसेठ, राम म्हेत्रे,



### अहिल्यानगर येथे सिमेंट रस्ता बांधकामाचा शुभारंभ
### सरस्वती कॉलनी येथे महादेव मंदिराचे सभामंडप बांधकामाचा शुभारंभ
### नाईकवस्ती येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकामाचा शुभारंभ

दिनेश घोडके, दत्ता दाभाडे, सरवर पठाण, शेख खाजाभाई, दिपक निकाळजे, मकसुद टेलर आदींसह मान्यवर उपस्थित होते. गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये माजी आमदार अमरसिंह पंडित आणि जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली विविध विकासकामांचे भव्य शुभारंभ होत असून सोमवार दि.१४ ऑक्टोबर रोजी गेवराई शहरांमध्ये अमरसिंह पंडित यांच्या हस्ते १ कोटी ३० लाख रुपये किंमतीच्या विविध विकास कामांचा भव्य शुभारंभ करण्यात आला आहे. अहिल्यानगर येथे सिमेंट रस्ता बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अहिल्यानगर येथील नागरिकांनी अमरसिंह पंडित यांचे आभार मानले. याप्रसंगी ड. रविंद्र गवारे, अण्णासाहेब लोणकर, दादासाहेब चौधरी, विलास चव्हाण, बळीराम पवार, रमेश राऊत, प्रदीप वायंदेशकर, कदम आबा, अर्जुनराव उदावंत, फलकेनाना, अनिल गंगणे, तुकाराम शिर्के, मेजर मुंडे, आसाराम चादर आदींसह अहिल्यानगर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गेवराई शहरातील सरस्वती कॉलनी येथे अमरसिंह पंडित यांच्याहस्ते महादेव मंदिर येथे १० लक्ष रुपये किंमतीच्या सभामंडप बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला. गेवराई शहरातील नाईक वस्ती येथे ३० लक्ष रुपये किंमतीच्या सिंमेट रस्ता व नाली बांधकामाचा शुभारंभ अमरसिंह पंडित यांच्याहस्ते करण्यात आला. गेवराई शहरात अमरसिंह पंडित यांच्याहस्ते १ कोटी ३० लक्ष रुपये किंमतीच्या विकास कामांचा भव्य शुभारंभ झाल्यामुळे शहरातील नागरिकांनी शिवछत्र परिवाराचे आभार मानले आहेत.

# धारूर मध्ये एसटी कंडक्टरला भर रस्त्यात प्रवाशांनी केली मारहाण

## सरकारी कामात अडथळा; पती-पत्नी विरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी ।** किल्ले धारूर

रस्त्यात बस थांबविण्यासाठी घंटी वाजवून कंडक्टरला खाली ओढून दोघा पती पत्नीने मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणला. या प्रकरणी वाहकाच्या तक्रारी वरून मारहाण करणाऱ्या पती-पत्नी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या बाबतची माहिती अशी की, दि. १५ ऑक्टोबर रोजी धारूर आगाराची धारूर-माजलगाव गाडीचे कंडक्टर शहादेव मंत्री आणि त्यांचे सोबत ड्रायव्हर श्रीकांत ठोंबरे हे सकाळी १०:४५ वा. धारूर बस स्थानकाच्या बाहेर घेवुन जात असताना गाडीत बसलेला प्रवाशी बन्सी रामकिसन चौरे याने बसची बेल वाजविली; म्हणून कंडक्टर मंत्री त्याला म्हणाले, तुम्ही बेल वाजवु नका. मी बस रोडच्या बाजुला थांबवितो. असे




म्हणताच बन्सी चौरे याने चालु बसचा दरवाजा उघडला व म्हणाला की, तुम्ही बस थांबावा. त्यामुळे ड्रायव्हर ठोंबरे यांनी तेलगांव रोडवर एस बी आय बँक समोर रोडच्या बाजुला बस थांबविली. बस थांबताच बन्सी चौरे याने कंडक्टर मंत्री यांना बसमधून खाली ओढून मारहाण करण्यास सुरुवात केली. त्या नंतर त्याची पत्नी संगीता चौरे खाली उतरली आणि तिनेही कंडक्टरचे कपडे फाडुन चप्पलने मारहाण केली. तर बन्सी चौरे यांने उजव्या हाताचा अंगठा धरुन मुरगळाला.

ते दोघे पती-पत्नी भर रस्यात्यातर कंडक्टर मंत्री याला रस्त्यावर मारीत असतानाच्या घटनेचा व्हिडिओ उपलब्ध असून त्यांनी सरकारी कामात अडथळा निर्माण करून मारहाण केली आहे. या प्रकरणी कंडक्टर मंत्री यांच्या तक्रारी वरून बन्सी चौरे व त्याची पत्नी संगीता चौरे या दोघांच्या विरुद्ध धारूर पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा निर्माण करून कर्तव्यावर असलेल्या कंडक्टरला मारहाण केल्या प्रकरणी गु. र. नं. २९९/२०२४ भा. न्या. सं. १३२, १२१(१), ११५(२),३५२ आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.धारूर पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल अशोक गवळी हे पुढील तपास करीत आहेत.

# शेतीसाठी शेकापचा खटारा निवडून द्या- भाई ॲड नारायण गोले पाटील

**प्रतिनिधी ।** माजलगांव

निवडणूक जाती धर्मासाठी नाही तर शेतीसाठी झाली पाहिजे, शेतकऱ्याच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी झाली पाहिजे पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही अलीकडे जातीला, धर्माला भांडवलदारी पक्ष, विकृत मनोवृत्तीचे भ्रष्टाचारी पुढारी महत्त्व देत असून शेतकऱ्याचे, कामगारांचे, कष्टकऱ्यांचे प्रश्न प्रलंबित असताना त्यावर कोणीही बोलायला तयार नाही उलट गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा हजारोच्या संख्येने वाढत असताना प्रस्थापित पुढारी केवळ घराणेशाही जोपासण्यात आणि भ्रष्टाचारातून माया जमवण्यात व्यस्त असताना कष्टकऱ्यांनी भ्रष्टाचारी आणि भांडवलदारी पुढार्याकडून आणि भांडवलदारी पक्षाकडून आपल्या हिताची जोपासना होईल अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे असून शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि प्रश्नासाठी रस्त्यावर उतरून हमीभावासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर आंदोलने, मोर्चे करून प्रशासनाला आणि शासनाला धारेवर




धरणारा शेतकऱ्याच्या कुटुंबातील उमेदवार विधानसभेत गेला पाहिजे, बीड जिल्हा क्रांतिसिंह नाना पाटील, गंगाधर आप्पा बुरांडे यांच्यासह आदि लाल बावट्यांच्या नेत्यांच्या विचाराचा असुन कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्याच्या आणि कामगारांच्या जीवनामध्ये क्रांती करण्यासाठी माजलगाव विधानसभेवर शेतकरी कामगार पक्षाचे भाई ड नारायण गोले पाटील यांच्या खटारा चिन्ह समोरील बटन दाबून जातीसाठी नाही तर मातीसाठी आणि शेतीसाठी शेतकरी कामगार पक्षाचा खटारा विधानसभेत पाठवा असे अवाहन सिमरी पारगाव येथे नागरिकांशी संवाद साधताना भाई ड नारायण गोले पाटील यांनी केले. यावेळी शेकडो गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लोकार्पण...

आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा येथील दत्त हॉस्पिटलचे डॉक्टर बाळासाहेब गिरहे यांनी नुकताच म्बुलन्स लोकार्पण सोहळा केला परिसरात रुग्णांना वेळेवर तातडीचे सेवा मिळावी यासाठी त्यांनी हे परिसरातील लोकांचे सेवेसाठी उपलब्ध केली यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब शिरसाठ सरपंच मोहन आमटे ,विकास आमटे ,पप्पू भुकान आदी मान्यवर उपस्थित होते छायाचित्र सुरेश कांबळे घाटातून

# मतदारसंघात कीमान एक गाव एक गोठा ही संकल्पना भविष्यात राबवा -सुरेश धस

**प्रतिनिधी ।** आष्टी

तालुक्यात हा पूर्णपणे दुग्ध व्यवसायावर अवलंबून असून या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुधाचे उत्पन्न घेतले जाते मात्र सध्याच्या परिस्थितीमध्ये हे गाव एक गोठा ही संकल्पना जर राबविली तर शेतकरी वर्गात नक्कीच भरभराट होणार असून मोठ्या प्रमाणात फायदा होणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री सुरेश धस यांनी केले.आष्टी तालुक्यातील कडा येथील आष्टी तालुका दूध संघाच्यावतीने दूध उत्पादक शेतकरी महिलाच्या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, व्हा.चेअरमन छायाताई अशोक गर्जे,आत्माराम फुंदे,सरपंच अशोक भवर,कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे, चेअरमन शिवाजी कोकणे,अनुजा गळगटे, अनिता पोकळे, सुनिता गिरी, छाया धस,भरत सुळे,व्यवस्थापक दिनकर दाणी आदी उपस्थित होते.

कडा येथे आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित आष्टी यांच्या वतीने दूध उत्पादक महिलांचा मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यास दूध उत्पादक शेतकरी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यावेळी पाहायला मिळाला तर यावेळी माजी आमदार सुरेश धस यांनी उपस्थित राहून दूध उत्पादक महिलांशी संवाद साधला.



यावेळी पुढे बोलताना माजीमंत्री धस म्हणाले की,दूध उत्पादक शेतकऱ्यांना शासकीय अनुदान मिळवून देण्यासाठी मी विधिमंडळात वेळोवेळी शेतकऱ्यांची बाजू मांडून धरली. यामुळे सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना ७ रुपये प्रतिलिटर अनुदान दिले.दुध उत्पादक शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान,मुक्त संचार गायगोठा पद्धतीने दुध व्यवसायात होणारी वाढ,दिवसेंदिवस शेतकरी विविध प्रजातीचे सिमेन्स वापरून सदृढ कालवडी बनवत आहेत,आज शेतकरी हुशार झाला आहे. पंजाब हरियाणा येथे जाऊन कालवडी खरेदी करत छोट्या व्यवसायाला मोठ्या स्वरूपात करण्यासाठी धडपडत आहेत.दुष्काळी परिस्थितीत मी आष्टी दुध संघाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मुरघास बॅगची सुरवात केली त्याच फलित म्हणून आहे प्रत्येक शेतकऱ्यांच्या दारात मुरघास बॅग दिसत आहेत, दुध व्यवसाय करत असताना गायींचा विमा संरक्षण करणे हे महत्वाचे आहे,अनेकदा अचानकपणे दुध दर कमी जास्त झाल्याने अनेकदा उत्पादक अडचणीत सापडलेला आहे,तेव्हा राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, दुग्धविकास मंत्री यांच्याशी राज्यातील प्रमुख सहकारी व खाजगी दुध संघाचे संचालक यांच्यासोबत वेळोवेळी सरकारला विनंती करत दुधाला अनुदान मिळवून देण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे, दुष्काळी परिस्थिती चारा छावण्याच्या माध्यमातून मतदार संघातील पशुधन वाचवण्यासाठी राज्यातील ईतर भागातुन चारा उपलब्ध करून छावण्या चालवल्या त्यामुळेच आज आपला दुध व्यवसाय कायम आहे. कोरोनाच्या काळात दुध व्यावसाय अस्थिर झाल्याचे चित्र दिसत होते परंतु तालुका दुध संघ उत्पादकांच्या खंबीरपणे पाठीशी उभा राहिल्याने हा व्यवसाय टिकून आहे,जेव्हा लंम्पि आजाराने अनेक शेतकऱ्यांच्या दुग्धजन्य गाई व पशुधन यांची काळजी म्हणून वेळोवेळी लसीकरण केले,वेळोवेळी आपण लसीकरण करण्यासाठी दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या गोठ्यामध्ये जाऊन आपण लसीकरण मोहीम राबवतो म्हणून दुध उत्पादकांचे तालुका संघावर असलेले प्रेम कायम आहे.या दुध व्यवसायात वेळ, प्रयत्न व पराकाष्ठा महत्वाची आहे, दोन वेळेचे संकलन होणे गरजेचे आहे,ज्यामुळे शेतकऱ्यांना आधिकच फायदा होतो, या सर्व कामात प्रत्येक कुटुंबातील महिला या दुध व्यवसायात अग्रेसर असल्याने यामध्ये महिलांचे योगदान विसरून चालणार नाही,यामुळे पुरुषासोबत दिवसरात्र राबणारी महिला ही दुध व्यवसायत महत्वाची बाब आहे..

यावेळी आष्टी तालुका दुध संघाच्या संचालिका प्राजक्ताताई धस म्हणाल्या की ,आष्टी तालुका दूध संघामार्फत अनेक योजना राबवित आहेत त्यापैकीच मुरघास ही संकल्पना सुरेश धस यांनी गेल्या पाच वर्षांपूर्वी राबवली होती. ही संकल्पना मोठ्या प्रमाणात प्रभावी ठरल्याने शेतकऱ्यांना चाऱ्याची अडचण निर्माण होत नाही तसेच मुरघासामुळे दुधाची गुणप्रत व दुधाचे उत्पन्न ही वाढण्यास मोठ्या प्रमाणात मदत झालेली आहे

# आदर्श शाळा स्पर्धेत खाजगी गटात जिजामाता विद्यालय तेलगाव तर शासकीय गटात जि प कन्या शाळा धारुर तालुक्यात प्रथम

**प्रतिनिधी ।** किल्ले धारूर

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ मध्ये तालुकास्तरावर शासकीय गटात जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा धारूर थर खाजगी गटात जिजामाता प्राथमीक विद्यालय तेलगाव या शाळेस प्रथम पारितोषिक.मिळाले आहे त्यांचे सर्वज्ञ कौतूक होत आहे.

शिक्षण विभागाचे वतीने राबवण्यात येणारे भारतरत्न रत्न डा बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने मुख्यमंजी माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -२ मध्ये तालूकास्तरीय निकाल गटशीक्षणाधीकारी याऩी जाहीर केला असुन या मध्ये तालुक्यात जिल्हा परीषद शाळा गटात प्रथम जि प कन्या प्राथमीक शाळा धारूर द्वीतीय जी प प्राथमीठ शाळा कारी, तृतीय जी प प्राथमीक शाळा जैथापुर, चौथी जि प प्राथमीक शाळा असोला तर खाजगी शाळा गटात प्रथम जिजामाता प्राथमीक शाळा तेलगाव, द्वितीय नुतन माध्यमीक विद्यालय अंजनडोह, तृतीय वंसुधरा माध्यमीक विद्यालय कोळपिप्री, चौथे नाथकृपा माध्यमीट विद्यखलय टासारी याऩी मिळवले या सर्व शाळाचे सर्वज्ञ कौतूक होत आहे

# वरचे संकेत मिळताच नितीन नाईकनवरे लागले कामाला

## ठरवाल ते धोरण,बांधाल तेच तोरण!

**प्रतिनिधी ।** माजलगांव

१४ ऑगस्ट रोजी नितीन नाईकनवरे यांचा वाढदिवस साजरा झाला.यावेळी विधानसभेच्या अनुषंगाने मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते.याची नोंद विविध राजकीय पक्षांनी घेतली होती.दरम्यान सोमवार दि.१४ रोजी नितीन नाईकनवरे यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यकर्ता बैठकीत तुम्ही ठरवाल ते धोरण आणि बांधताल ते तोरण असा एकमुखी निर्णय प्रमुख कार्यकर्तासह सरपंचांच्या बैठकीत घेण्यात आला.यातून वरिष्ठांच्या संकेत मिळताच नितीन नाईकनवरे विधानसभेच्या कामाला लागल्याचे दिसत आहे.

माजलगाव बाजार समितीचे माजी सभापती नितीन नाईकनवरे यांच्या निवासस्थानी सोमवार दि.१४ रोजी दुपारी कार्यकर्ता बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.येत्या विधान सभेत आपली उमेदवारी असावी किंवा नाही.याच्या चाचपणीसाठी या बैठकीचे आयोजित करण्यात आले होते.तत्पूर्वी १४ ऑगस्ट रोजी नितीन नाईकनवरे यांच्या वाढदिवसानिमित्त मोठे शक्ती प्रदर्शन करण्यात आले होते.याची नोंद



राजकीय पक्षांनी घेतली असल्याची माहिती आहे.त्यामुळे वरचे संकेत मिळतात नितीन नाईकनवरे कामाला लागले आहेत. यावेळी आयोजित कार्यकर्ता बैठकीला पंचक्रोशीतून प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीत उपस्थिती लावली होती.दरम्यान सर्वच उपस्थित कार्यकर्त्यांनी नितीन नाईकनवरे यांना विधानसभा लढवण्याचा आग्रह केला.दादा, तुमचे काम सर्व व्यापक आहे.सर्व जाती धर्मात आपल्याला मानणारा वर्ग आहे.समाज उपयोगी अनेक काम आपण मार्गी लावली आहेत. त्यामुळे येत्या विधानसभेत नेतृत्व करण्याची आपली धमक आहे. आपण कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी घ्या.आम्ही तुमच्या सोबत आहोत.आपण बांधाल ते धोरण आणि घेताल तो निर्णय आमच्यासाठी मान्य असेल.असा एकमुखी निर्णय यावेळी उपस्थिती कार्यकर्त्यांनी घेतला आहे.यावेळी अनेक गावच्या सरपंचासह प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या माध्यमातून नितीन नाईकनवरे वरचे संकेत मिळताच कामाला लागले असल्याचे दिसत आहे.

## मागणी



आष्टी (प्रतिनिधी)

बीड येथील रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नाव देण्यात यावे अशी मागणी सर्व जनतेकडून व आंबेडकर प्रेमी कडून होत आहे, वंचित बहुजन युवक आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनुरथ वीर साहेब उपोषण करत आहेत तरी आष्टी तालुक्यातील वंचित बहुजन आघाडी व आंबेडकर प्रेमी यांनी पाठिंबा दिला व प्रशासनाने प्रकरणाची दखल घ्यावी म्हणून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले, वंचित बहुजन युवक आघाडी तालुकाध्यक्ष कृष्णा गायकवाड, महासचिव सुरज निकाळजे, सहसचिव दयानंद निकाळजे, समाजसेवक ड.नामदेव चव्हाण, वंचित नेते अशोक निकाळजे व इतर कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

# वाढदिवसाच्या खर्चाला फाटा

## डॉ.यशवंत राजेभोसले यांच्या हस्ते गरजवंत कुटुंबांना किराणा किट वाटप

**प्रतिनिधी ।** माजलगांव

वाढदिवसानिमित्त कसलाही डामडौल न करता खर्चाला फाटा देत माजलगाव येथील नगर परिषद चे कर्मचारी आरेफ पटेल यांचा मुलगा मारुफ याचा जन्मदिन शहरातील, इंदिरा नगर, फातेमा नगर, अरफात मोहल्ला या भागातिल तब्बल १०० कुटुंबांना किराणा किटचे माजलगाव येथील डॉ. यशवंत राजेभोसले यांच्या हस्ते वाटप करुन साजरा केला. त्यामुळे माणुसकीचे मुल्य संर्वधित झाले असून आरेफ पटेल यांचे कौतुक होत आहे.

माजलगाव शहरातील इंदिरा नगर,फात्तेमा नगर,आरफात मोहल्ला,येथे आयोजित वाढदिवस कार्यक्रमास डॉ.यशवंत राजेभोसले पत्रकार बाळासाहेब आडागळे, सामाजिक कार्यकर्ते संतोष गायकवाड, अविनाश गायकवाड, आदित्य डावरे, राहुल धायजे, हमीद लाला, फैजल सय्यद आदी उपस्थित होते.या वेळी प्रत्येक पाहुण्यांनी प्रत्येकाने आपल्या वाढदिवसाच्या गोरगरीब मुलांसाठी खर्च करावा, गरजूवंत कुटुंबाला मदतीचा हात द्यावा. महाराष्ट्राची आदर्श संस्कृती दाखवून द्यावी असे मत सर्व प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले.



# माजलगाव पंचायत समिती लाचखोर अधिकारी महिला व बालविकास विभाग अनाथ व विधवा महिला कडून लाच घेणारा अधिकारी निलंबित

**तक्रार**

## ग्रामपंचायत सदस्य कपिल आडागळे यांनी पुणे आयुक्त कडे केली होती तक्रार

**प्रतिनिधी ।** टाकरवण

माजलगाव तालुक्यातील महिला व बाल विकास अधिकारी श्री. संतोष अंकुष डॉगरदिवे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ)हे उपरोक्त कार्यालयात कार्यरत असताना त्यांच्याकडे बालसंगोपन योजनेचा लाभ मिळाणे करीता अर्ज स्विकारण्याचे काम असल्याने, तसेच सदर योजनेचा लाभ देण्यासाठी त्यांनी तीन फॉर्मचे सहा हजार रुपये ची मागणी केली तर. अनेक लोकांकडून पैसे घेतल्याशिवाय काम न केल्या ने त्यांची तक्रार अर्जाद्वारे ग्रामपंचायत सदस्य कपिल आडागळे यांनी पुणे आयुक्त कडे पुराव्या सहित सादर केली . वरिष्ठ अधिकार्याच्या निदर्शनासआल्याने, त्यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचे योजिले आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड, विभागीय उपआयुक्त, छ. संभाजीनगर व महिला व बाल विकास आयुक्तालय (बाल विकास शाखा) पुणे यांनी पुढील प्रशासकीय कार्यवाही करणेकरीता कळविले आहे तरी श्री. डोंगरदिवे यांनी कर्तव्यात कसूर केला असल्याचे निदर्शनास आल्याने, खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे हे महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ चा नियम ४ चा पोटनियम (१) (अ) मधील तरतुदीनुसार याद्वारे श्री. संतोष अंकुश डोंगरदिवे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड (तालुका माजलगांव) यांना सदर आदेशाच्या दिनांकापासुन शासकीय सेवेतुन निलंबित करण्यात आले असुन् त्यांना पुढील आदेश येईपर्यंत ते निलंबित राहतील.



आदेश देण्यात आले आहे की, हा आदेश अंमलात असेल तेवढया कालावधीत श्री. संतोष अंकुश डॉगरदिवे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड (तालुका माजलगांव) यांचे मुख्यालय विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे राहील, त्यांना आयुक्तालयाचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. ४) श्री. संतोष अंकुश डोंगरदिवे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड (तालुका माजलगांव) यांना, त्यांच्या निलंबनाच्या कालावधीत महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन व अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन व बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८(१) (ए) नुसार अनुज्ञेय असणारा निर्वाहभत्ता मिळण्यास ते पात्र ठरतील.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम १६ च्या तरतूदीनुसार त्यांना निलंबन कालावधीत खाजगी नोकरी स्वीकारणे वा धंदा करणे अनुज्ञेय राहणार नाही, निलंबित असताना खाजगी नोकरी स्वीकारल्यास किंवा धंदा केल्यास ते गैरवर्तणूकीबद्दल दोपी ठरतील आणि कारवाईस पात्र ठरतील तसेच अशा बाबतीत ते निर्वाह भत्यावरील आपला हक्क गमावतील.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे की, सदर आदेशाची एक प्रत श्री. संतोष अंकुष डोंगरदिवे, संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बीड (तालुका माजलगांव) यांना बजावण्यात यावी व त्यांची दिनांकीत असलेली स्वाक्षरीत पोहोच आयुक्तालयास सादर करण्यात यावे. तसेच श्री. डोंगरदिवे यांच्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने प्रारुप दोषारोप जोडपत्र १ ते ४ व जोडपत्र ४ मधील सहपत्रांच्या प्रती विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, छ. संभाजीनगर यांच्या मार्फत आयुक्तालयास तात्काळ सादर करण्यात यावे.

# खासदार सोनवणे यांनी पत्रकारला संरक्षण देण्यासाठी दिले पत्र !

**प्रतिनिधी ।** केज

**बीडजिल्हाचे खासदार बजरंग सोनवणे खासदार असुन सुद्धा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभाला धंका लागु नये यांची सुध्दा काळजी खासदार बजरंग सोनवणे घेत आहेत या विषयी सविस्तर वृत्त असे की रोहन गलांडे एक मराठा असल्यामुळे व मराठा आरक्षणात सक्रीय असल्याने मराठा समाजातील मुंदडा यांच्या कार्यकर्त्यांनी व मुंदडाच्या कार्यकर्ते जरांगे पाटील समर्थक पत्रकार रोहन गलांडे**

यांना मागिल दोन चार दीवसापुर्वी जिवे मारण्यांची धमकी



देण्यात आली होती कारण पत्रकार रोहन गलांडे पाटील यांची परखड लेखनी विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांना जाचक वाटत आहे व त्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांन कडुन रोहन गलांडे यांना धमकावून जिवे मारण्यांची धमकी दिली आहे तरी पत्रकार रोहन गलांडे पाटील यांना केज अंबाजोगाई मतदार संघाचे आमदार नमीता मुंदडा व त्यांच्या कार्यकर्त्यांन कडुन जिवीतास धोका असल्याने बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ यांनी पोलिस अधीक्षक यांना मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील समर्थक पत्रकार रोहन गलांडे पाटील यांना संरक्षण देण्यासाठी पत्रा द्वारे मागणी केली आहे.तरी रोहन गलांडे पाटील यांनी खासदार बजरंग सोनवणे यांचे आभार मानले आहेत.

# सोशल मीडिया, बूथ व्यवस्थापनाचे प्रभावी प्रशिक्षण

## ठरलं! बीडची जागा राष्ट्रवादी काँग्रेसलाच

**प्रतिनिधी ।** बीड

बीड विधानसभा मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून सातत्याने दावा केला जात आहे. आता आचारसंहिता जाहीर झाली असून निवडणुकीसाठी बीड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सज्ज असल्याचे चित्र दिसून येत आहे. नुकतेच सोशल मीडिया आणि बूथ व्यवस्थापनाचे प्रभावी प्रशिक्षण शिबिर पार पडले आहे.




बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आयोजित सोशल मीडिया आणि बूथ व्यवस्थापनाचे प्रभावी प्रशिक्षण नुकतेच संपन्न झाले. ज्यात ४७५ पेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी प्रशिक्षणातून सोशल मीडिया तंत्रज्ञानाचे आधुनिक कौशल्य आणि बूथ व्यवस्थापनाच्या रणनीती शिकत, जनसंपर्क अधिक प्रभावी कसा करता येईल, याचे धडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने देण्यात आले. शिबिराला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निवडणूक लढवण्यासाठी सर्वार्थाने सज्ज असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, बीड मतदारसंघात पक्षाच्या खाजगी कंपनीकडून सुरू असलेल्या प्रचार व प्रसार मोहिमेवरून सध्यातरी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांना उमेदवारी असल्याचे संकेत मिळत आहेत.

यापूर्वी अनेकदा बीड विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळणार असल्याचा दावा खुद्द उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी देखील केलेला आहे. तसेच महायुतीकडून सुरू असलेल्या वाटाघाटीत बीडच्या जागेवर शिक्कामोर्तब झाले असून ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाटेला जाणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# शिवसंग्राम आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाची आढावा बैठक संपन्न

१ अनेकांची इच्छा मी शिवसंग्राम तर्फे निवडणूक लढवावीआष्टी येथील बैठकीत डॉ.ज्योती मेटे यांचे प्रतिपादन

२ डॉ. ज्योती मेटे यांची शिवसंग्राम कडून निवडणूक लढण्याचे संकेत

## डॉ.ज्योती मेटे यांची परिवर्तन संकल्प यात्रा



**प्रतिनिधी ।** बीड

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी परिवर्तन संकल्प यात्रा काढली आहे. यात त्या जिल्ह्यासह बीड विधानसभा मतदार संघात जनतेशी आणि कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या यात्रेच्या अनुषंगाने त्यांनी दी. १४ ऑक्टोबर रोजी आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्याची आढावा बैठक हॉटेल सद्गुरू, धामणगांव रोड, कडा घेतली. यात आष्टी विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत बोलत असताना आपण शिवसंग्रामच्या वतीने निवडणूक लढावी अशी अनेकांची इच्छा आहे यावर मी योग्य तो निर्णय घेईल असे डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या.

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या निधननंतर देखील शिवसंग्रामचे अस्तित्व त्याच तोलाचे आहे. साहेब कायम विस्थापिता सोबत खंबीर पने उभा राहिले. त्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवत राहिले आणि त्यांना राजकीय पटलावर संधी देत राहिले. शिवसंग्राम साहेबांच्या पश्चात त्यांच्या विचाराशी कधीही तडजोड करणार नाही. काल दसरा मेळाव्याला नारायण गडावर उपस्थित राहण्याचे भाग्य मिळाले यावेळी देखील महाराष्ट्रभरातील अनेकांनी साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. त्याचबरोबर मी बीड विधानसभा निवडणूक शिवसंग्राम कडून लढावी अशीही इच्छा अनेकांनी बोलून दाखवली यावर देखील मी योग्य वेळी निर्णय घेईल परंतु आता तुम्ही जोमनी कामाला लागा त्याचबरोबर आपण या परिवर्तन संकल्प यात्रेच्या माध्यमातून जिल्हा सह बीड विधानसभा मतदारसंघात जनतेशी संवाद साधणार आहोत. असे प्रतिपादन यावेळी बोलताना डॉ. ज्योती मेटे यांनी केले.

याप्रसंगी शिवसंग्रामचे प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, सावरगाव येथील मच्छिंद्रनाथ गडाचे महंत ह भ प वाघमारे महाराज, बीड विधानसभा प्रमुख प्रा. सुभाष जाधव , जिल्हा सरचिटणीस ज्ञानदेव थोरवे,आष्टी तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी,शिरूर शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष माऊली शिंदे, पाटोदा शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष सुशील तांबे, ज्येष्ठ नेते ज्ञानेश दादा पानसंबळ, राजेंद्र माने, सुनील कुटे, आष्टी शिवसंग्रामचे नेते अशोक चौधरी, संपर्कप्रमुख राजू म्हस्के,शिवाजी म्हस्के, राजेंद्र मस्के, राहुल चौधरी,माऊली गायकवाड, मयूर चव्हाण,अरबाज सय्यद, तुकाराम काळे, बाबू धनावडे संकेत चौधरी, तुकाराम काळे, गणेश हरकर तसेच तेज वार्ता न्यूज पोर्टल चे पत्रकार इब्राहिम सय्यद शिरूर कासारचे शिवसंग्राम नेते योगेश काका जाधव, शिवाजी काका वारे, रामेश्वर पांडुळे,विजय शिंदे प्रभाकर डोंगरे व अन्य शिवसंग्राम पदाधिकारी कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ साठी सौ प्रियंकाताई खेडकर ठरल्या देवदूत




**प्रतिनिधी ।** गेवराई

गेवराई तालुक्यातील महत्त्वाचे समजलं जाणारे गाव म्हणजे चकलांबा या गावच्या कर्तव्यदक्ष सरपंच सौ प्रियांकाताई शिवप्रसाद खेडकर यांच्या संकल्पनेतून राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या होणाऱ्या गैरसोयीची दखल घेत सौ प्रियंकाताई खेडकर यांनी चकलांबा येथे मुक्कामी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना विश्रांती ग्रह व प्रवाशांसाठी प्रवासी शेड तयार करून संपूर्ण जिल्ह्यामध्ये एक वेगळाच आदर्श घालून दिला आहे तसेच एसटी कर्मचाऱ्यांसाठी अविरत झगडणारे कामगार नेते स्वर्गीय बंडूभाऊ बारगजे यांच्या स्मरणार्थ चकलांबा बस स्थानकाला स्वर्गीय बंडूभाऊ बारगजे बस स्थानक व कर्मचारी विश्रांती निवास असे नाव देण्यात आले या कार्यक्रमासाठी उपस्थित स्वर्गीय बंडूभाऊ बारगजे यांचे चिरंजीव सुदर्शन बारगजे , श्रीमती अनुजा दुसाने मॅडम विभाग नियंत्रक बीड,मा. श्री राजकुमार दिवटे विभाग वाहतूक अधिकारी बीड, मा. श्री. शिवराज कराड विभागीय वाहतूक अधीक्षक बीड,मा. श्री. संतोष डोके साहेब आगार प्रमुख गेवराई, मा.श्री विनोद सौंदरमल मा. नगरसेवक गेवराई,मा. श्री. दादासाहेब घोडके मा. नगरसेवक गेवराई, मा श्री संतोष सुतार (पत्रकार साहेब ), मा श्री उत्तमराव सोलाणे साहेब,मा. श्री. सचिन ढाकणे (सरपंच वडगाव ढोक), मा श्री प्रदीप उगलमुगले (सरपंच मिरकाळा ), मा श्री शहामत शेख सरपंच मांहाडोळा,मा श्री. सुनील सुरवसे सरपंच अर्धा पिंपरी, मा श्री दत्ताभाऊ शिंदे सरपंच चोरपुरी,मा श्री.अंबादास सांगळे सरपंच बालानाईक तांडा, मा श्री. सुनील शेंबडे सरपंच शेकटा, मा. सौ. अरुणा बापूराव महानोर सरपंच महारटाकळी, मा श्री फयूम शेख सरपंच हिवरवाडी, मा श्री अतीम पठाण सरपंच रसुलाबाद, मा श्री गोवर्धन घोडके सरपंच धमेगाव आदी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती अनुजा दुसाने मॅडम यांनी सरपंच सौ प्रियांका ताई शिवप्रसाद खेडकर यांनी केलेल्या कर्मचाऱ्यांच्या विश्रांती ग्रह व प्रवासी निवारा शेड च खूप कौतुक केले अशा प्रकारचे काम सर्व गावांमध्ये व्हावे अशी आशा व्यक्त केली शेवटी सरपंच सौ प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानले



## तलवाड्यात बदामराव पंडितांच्या नेतृत्वाखाली

# असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**प्रतिनिधी ।** गेवराई

गेवराई विधानसभा मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली तलवाडा येथील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघातून तीन वेळेस आमदार राहिलेले माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे महाविकास आघाडीच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून यावेळी विधानसभेची निवडणूक लढविणार आहेत. विधानसभा निवडणूक जाहीर होण्याअगोदरच बदामराव पंडित यांनी गेवराई मतदार संघात भेटीगाठीचा आपला एक दौरा पूर्ण केला आहे या दौऱ्या दरम्यान अनेक गावातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या असंख्य पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेनेमध्ये होणारी ही इनकमिंग सुरूच असून दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी तलवाडा येथील सुनील डोंगरे, महेमूद भाई, जितेंद्र आठवले, शेख नवीद, शेख रियान, श्रावण आठवले, शेख रज्जाक, भाऊसाहेब जगताप, शेख इमरान, आसाराम जाधव, आकाश आठवले आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. शिवसेना बीड जिल्हा समन्वयक तथा जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी सर्वांचे गळ्यात भगवे रुमाल घालून स्वागत केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT